# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

**स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका**

Price ₹ 3/-

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

# संवाद

***मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।***
***सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।***

**Vol.-4** **Issue - 6** डिसेंबर - २०११ **December 2011**


## संपादकीय

**प्रिय सभासद मित्रांनो,**

अनादी आणि अनंत म्हणजेच आदी किंवा अंत नसलेला असा 'काळ' आपल्या गतीनुसार सतत पुढे सरकत असतो. तो कुणासाठीही कधीच थांबत नाही किंवा कुणी त्याला रोखूही शकत नाही. माणसाने 'कालमापन शास्त्र' शोधून काढलं आणि स्वत:च्या सोयीसाठी काळाचं मोजमाप तो करू लागला. घटका-पळे-विपळे, तास-दिवस-महिना-वर्ष असे त्याने काळाचे तुकडे पाडले आणि तो काळ मोजू लागला. भूत-वर्तमान-भविष्य अशी काळाची विभागणी माणसानेच केली. काल-आज आणि उद्या हे भूत, वर्तमान व भविष्यकाळाचे प्रतिनिधी बनले. काळाचाच भाग असलेले 'वर्ष २०११' लवकरच संपेल ते डिसेंबर दिनांक ३१ ला रात्री १२ वाजता आणि त्याच क्षणी सुरू होईल 'वर्ष २०१२'. सन '२०११' ला आपण त्या क्षणी निरोप देऊ आणि 'सन २०१२' या नववर्षाचं हर्षोल्हासात स्वागत करू. आपले बहुतेक दैनंदिन व्यवहार इंग्रजी कालगणनेनुसार होत असल्यामुळे आपण इंग्रजी तारीख, महिना व वर्ष यांचाच वापर बोलताना व लिहिताना सर्रास करीत असतो. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन येणाऱ्या नववर्षाचे-'२०१२' चे आपण मनापासून स्वागत करूया आणि एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा देऊया. खरं म्हणजे एकमेकांचे शुभ चिंतण्यासाठी मुहूर्त किंवा विशिष्ट वेळ कशाला हवी? ते क्षणोक्षणी करायला हवं. कारण येणारा प्रत्येक क्षण सुखा-समाधानाचा व आनंददायी व्हावा हीच आपली प्रत्येकाची मनोमन इच्छा असते. म्हणूनच दोन व्यक्ती एकमेकांना भेटल्या की त्या मान लववून, हात उंचावून, हात जोडून किंवा हस्तांदोलन करून एकमेकांचं उघडपणे शब्दांद्वारे नसलं तरी मनातून अभीष्टच चिंतीत असतात. तेव्हा सर्वांचे नववर्षानिमित्त अभीष्टचिंतन आणि मनापासून शुभेच्छा.

सन २०११ या वर्षातील नोव्हेंबर म्हणजे अकराव्या महिन्याचा दि. ११ हा अकरावा दिवस अर्थात् '११-११-११' हे आकडे दर्शविणारा दिवस नुकताच पार पडला. अर्थात् दुर्मिळ वा चमत्कृतिसदृश भासणाऱ्या आणि शंभर वर्षातून एकदाच येणाऱ्या या दिवसाचे आकर्षण शुभमुहूर्ताप्रमाणे आजच्या २१ व्या शतकातील वैज्ञानिक समजल्या जाणाऱ्या जगभरातील असंख्य माणसांना वाटलेच ना? विवाहासाठी, जन्मदिवस गाठण्यासाठी (मग त्या दिवशी जन्मणाऱ्या अर्भकाचा जन्म नैसर्गिक असो वा तो शुभदिन गाठण्यासाठी शस्त्रक्रियेद्वारे घडविलेला असो) या दिवसाची शुभमुहूर्तासारखी निवड अनेकांनी केलीच की नाही? इतरांकडूनही त्याचं स्वागत नि कौतुकही झालंच ना? ही देखील एक प्रकारची अंधश्रद्धा मानली तरी ती माणसाची सहज प्रवृत्ती आहे हे लक्षात घेऊन आपण त्यावर टीका न करणेच बरे. असो.

प्रामाणिकपणे सांगायचं तर आम्हाला 'अकरा अकरा' म्हणजे ११ नोव्हेंबर पेक्षाही 'सोळा अकरा' म्हणजे १६ नोव्हेंबर या दिवसाचं अधिक महत्त्व नि मोल वाटतं. कारण १६ नोव्हेंबर हा आपल्या सर्वांचे अत्यंत लाडके नेते, मार्गदर्शक व दीपस्तंभ असणारे आदरणीय श्री. बी.जी. अर्थात् बाळ गणेश दांडेकर यांचा वाढदिवस. बी.जी.दांडेकर महोदयांवर यानिमित्त नुकताच 'लोकसत्ता' दैनिकाच्या शनिवार दि. २६ नोव्हेंबरच्या 'चतुरंग पुरवणी'त 'स्टेट बँक पेन्शनरांचा देवदूत' या शीर्षकाचा संपदा वागळे यांनी लिहिलेला नितांत सुंदर लेख प्रसिद्ध झाला आहे. (सभासदांच्या माहितीसाठी 'संवाद'च्या या अंकात तो लेख समाविष्ट केलेला आहे.) आपल्या कृतार्थ जीवनाची ८२ वर्षे पूर्ण करून ८३ व्या वर्षात उत्साहाने पदार्पण केलेल्या आणि आपल्या सर्वांना देवदूतासमान असलेल्या बी.जी.दांडेकर महोदयांचं आपण वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन करूया. अत्यंत आर्जवी व मृदू स्वभाव, आरपार प्रामाणिकपणा, अभ्यासू व चिंतनशील वृत्ती,विषयाचं सखोल व संपूर्ण ज्ञान, तर्कशुद्ध विचार मांडण्याची पद्धत, आपले विचार पटवून देण्याचं विलक्षण कौशल्य, प्रभावी वक्तृत्व, अखंड परिश्रम, सहकाऱ्यांना न्याय मिळवून देण्याची तळमळ व त्यासाठी झटून काम करण्याची वृत्ती अशा अनेक दुर्मिळ गुणांनी संपन्न असलेले व्यक्तिमत्त्व आपल्या दांडेकर साहेबांना लाभलेले आहे. त्यांच्यातील काही गुण अल्पांशाने जरी आपण अंगी बाणवले तरी आपल्या जीवनाचे सार्थक होईल. आपल्या दांडेकर साहेबांचे - 'बाळ गणेशां'चे-मार्गदर्शन आपल्याला यापुढेही दीर्घकाळ मिळत राहो आणि त्यांना आरोग्यसंपन्न व समाधानी दीर्घायु लाभो अशी परमेश्वरापाशी आपण प्रार्थना करूया. सर्वांनाच '२०१२' या आगामी नववर्षाच्या पुन:श्च शुभेच्छा!


**- क्रांतिसेन रामचंद्र आठवले,**
भ्रमणध्वनी ९८६९९४१६९१

## Supreme Court of India
## Writ Petition (Civil) No.184 of 2011

As informed in the November 2011 issue of SAMVAD (page - 2), while passing the order on 2nd November 2011, the court said : "Since sufficient time has been granted to the respondents for filing counter affidavit, no further time can be granted by this court for the same. List before the Hon'ble Court, as per rules". Now it has been notified by the Court that **the case has been listed on 16th January 2012** for further hearing. We hope to get justice as per our prayer from the Supreme Court soon. ***- Secretary***

## For attention of the Members from Nagpur Zonal Sub-Centre
## 'N.G.More Service Award'

It has been decided in the Circle Managing Committee Meeting dt.6th June 2011 held at Thane that as wished by Shri.E.K.Thakur, Ex-Member of Parliament, while giving the Donation of Rs.1,11,111/- in the meeting of Nagpur ZSC, the prizes - that is **"N.G.More Service Award"** - will be given to the two deserving members - one from Nagpur City and another for rest of the Vidarbha area / Districts.

These prizes will be given every year (i.e. April to March) out of interest earned on the funds donated by Shri.Thakur. The prizes will be given to those members who are doing excellent work for the Association in any manner as mentioned below and whose names have been recommended by the Managing Committee of Nagpur ZSC to the Circle Managing Committee.

**For the sake of good order it would be appreciated if the member desiring to get awarded the prize under the "N.G.More Service Award" should apply to the President of the Nagpur Zonal Sub-Centre with the relative bio-data and details of the work done by him.**

The Circle Managing Committee will take a decision in the matter by taking into account the recommendations made by the Managing Committee of the Nagpur ZSC. The Circlre Managing Committee will decide and declare such prizes for the year 2011-2012 in its meeting to be held in the first quarter of the year 2012-2013 (i.e. next year). This decision will be published in 'SAMVAD' in due course before the next AGM. The prizes will be given at the hands of our President in the following Annual General Meeting.

The remarkable work in the following fields will be considered.

1) Keen interest in drive for enrolling new members/collection of Donations etc;
2) One who involves himself / herself in the affairs of the Association;
3) One who shows commitment in fulfilling the objectives of the Association;
4) One who motivates other members to involve in the membership drive;
5) One who is responsive to the Circle Association's policies;
6) One who maintains constant rapport with other members & functionaries in Nagpur Zonal Office.

**This is for the information of the members from Nagpur Zonal Sub-Centre area only.**

***- Secretary***

# स्टेट बँक पेन्शनरांचा देवदूत

निवृत्तीनंतर दरमहा मिळणारी पेन्शन म्हणजे निवृत्तीधारकांसाठी स्वाभिमानाने जगण्याचा आधार. साहजिकच या संबंधातील कोणतीही बाब हा या मंडळींच्या जिव्हाळ्याचा विषय. म्हणूनच पेन्शन संदर्भातील अडचणीतून मार्ग काढण्यासाठी हात देणारी व्यक्ती त्यांना देवदूत वाटली तर नवल नव्हे. स्टेट बँकेच्या एक लाख पेन्शनरांनी असाच एक देवदूत ज्या माणसामध्ये बघितला, त्याचं नाव 'बाळ गणेश दांडेकर' ऊर्फ 'दादा'.

स्टेट बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये १९५१ साली दादा टायपिस्ट म्हणून रुजू झाले आणि ३६ वर्षे नोकरी करून १९८७ मध्ये त्यांनी सेवानिवृत्ती घेतली. तेव्हापासून गेली दोन तपं ते पेन्शनरांचे प्रश्न सोडविण्यासाठी जीवाचं रान करीत आहेत. निवृत्तीनंतर कै.एस.एस.पंडित यांच्या आग्रहामुळे त्यांनी पेन्शनर असोसिएशनच्या कामात लक्ष घालायला सुरूवात केली. पुढे मुंबई केंद्राच्या स्थापनेत हिरिरीने भाग घेतला व सलग ११ वर्ष सेक्रेटरीपदाची धुरा सांभाळली. त्यानंतर ९० साली फेडरेशनचे सेक्रेटरी, मग सहा वर्षे फेडरेशनचे सरचिटणीस, तद्नंतर सहा वर्षे उपाध्यक्ष, पुढची ३ वर्षे अध्यक्ष अशा पायऱ्या ते चढत गेले आणि आता ८०चा उंबरठा पार केल्यावरही ते सल्लागार म्हणून कार्यरत आहेत.

नोकरीत असतांना दादांनी १९ वर्षे सेंट्रल कार्यालयाच्या पर्सोनेल विभागामध्ये काम केल्याने तिथल्या अनुभवाचा व नैपुण्याचा त्यांना फेडरेशनचे काम करीत असताना भरपूर उपयोग झाला. बँकेसमोर पेन्शनरांची बाजू मांडणं असो वा नोकरीत असताना बँकेची बाजू कोर्टासमोर मांडणं असो, त्यांनी केलेला चोख गृहपाठ बघून भलेभलेही थक्क होत. त्यांनी कामाला सुरूवात केली तेव्हा अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी कोर्टाची पायरी चढणे एवढा एकच मार्ग खुला होता. कारण पेन्शनर किंवा त्यांच्या प्रतिनिधीशी बोलणी करणे ही कल्पनाच मुळी मॅनेजमेंटला मान्य नव्हती. अशा परिस्थितीत अशक्यप्राय आणि असंभव वाटणाऱ्या किती तरी समस्या दादांनी आपल्या सहकाऱ्यांच्या समवेत ज्या तडफेनं सोडवल्यात त्याला तोड नाही.

फेडरेशनच्या प्रयत्नांमुळे सर्वोच्च न्यायालयाने १९८९ मध्ये दिलेल्या आदेशानुसार जानेवारी ८६ पासून स्टेट बँक पेन्शनरांना निवृत्त होताना मिळणाऱ्या पगाराच्या ५० टक्के पेन्शन आणि कमीत कमी रु,३००/- (बेसिक) फॅमिली पेन्शन लागू झालं. मात्र ही योजना कार्यान्वित होताना बँकेच्या भारतभर पसरलेल्या निवृत्तीधारकांपुढे ज्या ज्या समस्या उभ्या राहिल्या त्या सोडवण्यासाठी दादा देशभर अक्षरश: पायाला चाकं लावून फिरले.

जेव्हा एखादी कठिणात कठीण अशी समस्या त्यांच्या पुढे येई तेव्हा तर त्यांना जणू स्फुरण चढे आणि तहानभूक विसरून ते तिचा मागोवा घेत. भुवनेश्वरमध्ये घडलेली ही कहाणी तर डोळ्यात पाणी आणणारी. श्री.पी.सी.जी (Jee) या गृहस्थांनी एकदा तिकडच्या देवळाबाहेर भीक मागणारी एक स्त्री बघितली आणि त्यांच्या काळजात चर्रर्र झालं. कारण ती होती त्यांचा एकेकाळचा सहकारी गजेंद्र रेड्डी यांची पत्नी. त्यांनी तिला घरी नेऊन चौकशी केली तेव्हा कळलं की रेड्डींचं १९७७ मध्येच निधन झालंय. गजेंद्रच्या मृत्यूनंतर तब्बल २५ वर्षांनी पत्रव्यवहार सुरू झाला आणि मृत्यू प्रमाणपत्र वगैरे महत्त्वाचे पुरावे नसतानाही मिस्टर 'जी' यांच्या आधारावर दादांनी त्या असहाय्य महिलेला जगण्यासाठी हक्काचा आधार मिळवून दिला. तिला दोन लाख रुपयांच्या थकबाकीसह दरमहा रु.१२२४ फॅमिली पेन्शन (त्यावेळी) मिळू लागली आणि रेड्डी नावाची ती स्त्री आत्मसन्मानानं जगू लागली.

या वाटचालीत छोटे मोठे पडाव किती पार केले याची तर गणतीच नाही. पूर्वी फॅमिली पेन्शन ही फक्त मृत कर्मचाऱ्याच्या पत्नीलाच मिळत असे. दादांच्या पुढाकाराने आता या नियमात सुधारणा होऊन फॅमिली पेन्शन, पत्नी नोकरीत असेल तर तिच्या पतीस/घटस्फोटित मुलीला/अपंग मुलांना (तहहयात)/अवलंबून असणाऱ्या २५ वर्षापर्यंच्या मुलांनाही मिळू लागली आहे. 'रिटायर्ड एम्प्लॉईज मेडिकल बेनिफिट स्कीम' ही योजना प्रामुख्याने दादांच्या प्रयत्नांनी १९९६ मध्ये आकारास आली. या आधारे हॉस्पिटलच्या खर्चाचा परतावा देणारी रक्कम आता दोन लाखांवरून सात लाखांवर पोहोचली आहे. ठाणे शहराच्या मध्य भागात बँकेच्या आजी-माजी कर्मचाऱ्यांसाठी उत्तम प्रकारे चालवला जाणारा दवाखाना हे त्यांच्याच कष्टांचं फळ आहे.

दादांमधील नेतृत्व गुणांची झलक बँकेत काम करीत असतानाच दिसून आली. १९६१ मध्ये बँकेतील कर्मचाऱ्यांची पहिली सहकारी हाऊसिंग सोसायटी पूर्ण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. सांताक्रूझमधील ४८ फ्लॅट्सची ती इमारत त्यांनी विक्रमी वेळात (फक्त दहा महिन्यात) व बजेटपेक्षाही कमी खर्चात उभी केली. त्यामुळे अनेक नव्या सोसायट्यांना प्रेरणा मिळाली आणि सल्ल्यासाठी दादांपुढे रीघ लागली.

स्टेट बँक मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना हा त्यांचा बँकेमधील कारकीर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा. या मंडळाच्या उद्घाटनासाठी आचार्य अत्रे आणि शाहीर अमरशेख हे दिग्गज आले होते. दादांच्या आयुष्यावर प्रभाव टाकणारी त्यावेळची ही एक आठवण. मंडळात एकदा प्रख्यात इतिहास संशोधक बाळशास्त्री हरदास यांचं १८५७ ते १९४७ या विषयावर व्याख्यान ठेवलं होतं. बाळशास्त्री वेळेचे

काटेकोर. ते अगोदरच हजर होत. आणि हॉलमध्ये हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच श्रोते. (सर्व मंडळींना आरामात येण्याची सवय.) त्यावेळी शास्त्रींनी निक्षून सांगितलं की, समोर दोन डोकी असली तरी कार्यक्रम ठरल्या वेळीच सुरू करायचा. असं केलंत तरच शिस्त लागेल. त्यांचे हे शब्द दादांच्या मनावर एवढे ठसले की, आजही असोसिएशनची दादरच्या शिवाजी मंदिरात भरणारी सभा अगदी घड्याळाच्या ठोक्यावर सुरू होते आणि वेळेतच संपते. कर्जत ते कसारापर्यंत राहणारे ६००/७०० पेन्शनर दिलेल्या वेळेच्या पाच-दहा मिनिटं आधीच आसनांवर स्थानापन्न झालेले असतात.

अशा प्रकारे सर्वच क्षेत्रात भरारी घेत असताना १९७५ साली एका मोठ्या अपघाताला त्यांना सामोरं जावं लागलं आणि नाकाचा बराच मोठा भाग त्यांना गमवावा लागला. स्वाभाविकच त्यानंतर त्यांना तोंडाने श्वासोच्छ्वास करणं आवश्यक झालं. यामुळे घशाला कोरड पडत असल्याने त्यांना सतत पाणी प्यावं लागतं. रात्री आडवं होऊन झोप घेता येत नसल्याने झोपेविना तासन्तास बसून काढावे लागतात. पण संघटनेचं काम करताना अशा वैयक्तिक अडचणींचा त्यांनी कधीच बाऊ केला नाही.

वक्तशीरपणा, व्यवस्थितपणा व शिस्त यांचे धडे कुणीही दादांकडून घ्यावेत. संपर्क ठेवणे व पाठपुरावा करणे यांमध्ये त्यांचा हातखंडा आहे. त्यांनी आतापर्यंत देशभर दौरे केलेत त्यांची तसंच वेळोवेळी केलेल्या एस.टी.डी. कॉल्सची नोंद त्यांच्यापाशी आहे.

दादांच्या या दीर्घ तपस्येचं फळ त्यांना २००५ साली 'कै.ल.ना.पाबळकर' स्मृती सुवर्णपदकाच्या रूपात मिळालं आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वावर मोहोर उठली. या १६ नोव्हेंबरला दादांना ८२ वर्षे पूर्ण झाली. तरीही एखाद्या तरुणाच्या आवेशात पेन्शनरांच्या विविध मागण्यांसाठी त्यांचा लढा सुरूच आहे. १९८६ नंतर चार वेळा पगाराची फेररचना होऊनही पेन्शन व फॅमिली पेन्शनमध्ये काहीही बदल झालेला नाही. फॅमिली पेन्शन तर आजही रु.३००/- (बेसिक) एवढंच आहे. या विरोधात सुरू असलेले त्यांचे प्रयत्न सर्वांना अवाक् करणारे आहेत. उदा. यासाठी त्यांनी सर्वपक्षीय अशा १०४ खासदारांच्या सह्यांचं पत्रक अर्थमंत्री चिदंबरम यांना नेऊन दिलं. मुंबईच्या आझाद मैदानावर आणि दिल्लीला जंतरमंतर येथे देशभरातील वृद्ध पेन्शनरांना बरोबर घेऊन धरणं आंदोलन पार पडलं. याविषयी त्यांचा सतत पत्रव्यवहारही सुरू असतो. मुख्य म्हणजे त्यांची ही धडपड चाललीय ती सगळी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय'. कारण फेडरेशनच्या एकूण एक मागण्या मान्य झाल्या तरी दादांच्या स्वत:च्या पेन्शनमध्ये एक पैशाचीही वाढ होणार नाही हे वास्तव आहे.

गेल्या वर्षी तीव्र दृष्टिदोष झाल्याने त्यांच्यावर अनेक निर्बंध आले होते. पण आता कॉर्निया ट्रान्सप्लांटेशनच्या यशस्वी ऑपरेशननंतर त्यांची सेकंड इनिंग पुन्हा दमदारपणे सुरू झाली. आता संघटनेच्या कामाबरोबर नेत्रदानाच्या प्रसाराचं कामही त्यांनी हाती घेतलंय. काम झालं की साहजिकच दादांना लोक विचारतात की तुमच्यासाठी काय करू? यावर त्यांचं उत्तर असतं, 'मला कांही नको, 'फूल ना फुलाची पाकळी' म्हणून असोसिएशनला कांहीतरी देणगी द्या. आता त्यात 'दृष्टिदानाचा संकल्प करा' हेही ते आवर्जून सांगतात.

- संपदा वागळे, ठाणे

(मो.-०९९३०६८७५१२)

(वरील लेख हा दि.२६ नोव्हेंबर २०११ च्या दै.लोकसत्ताच्या 'चतुरंग' पुरवणीमध्ये प्रसिद्ध झाला आहे. आपल्या सर्व सभासदांच्या माहितीसाठी संपादक, दै.लोकसत्ता यांच्या सौजन्याने छापला आहे)

S.B.I.Retired Employees
Medical Benefit Scheme

## Treatment taken Abroad

It has been advised by the Corporate Centre in respect of treatment taken abroad that it has now been decided by the Bank to revise the guidelines that members of the said scheme in their own interest should take Medical Insurance from a recognised Company before proceeding abroad as **the treatment taken abroad normally is not reimbursable under the scheme**.

- Secretary

## अभिनंदन

आपले सांगली विभागाचे सभासद व उपाध्यक्ष श्री. विठ्ठल रामाचार्य कट्टी यांची नात (मुलीची मुलगी) कु. गायत्री हिला ज्युदो या खेळ प्रकारात १४ वर्षाखालील मुली ३२ किलो या गटात सिंधुदूर्ग-ओरस येथे झालेल्या स्पर्धेत सांगली जिल्ह्यात विभागीय गटात सुवर्णपदक तर महाराष्ट्र राज्य स्पर्धेत ब्राँझ पदक मिळाले आहे.

गायत्रीच्या या सुयशाबद्दल तिचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन.

**- सेक्रेटरी**

# युनीट वार्ता

**दहिसर युनीट -**

३० ऑक्टोबर २०११ रोजी युनीटचा वर्धापन दिन सोहळा दहिसर शाखेत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या निमित्त युनीटतर्फे काढण्यात आलेल्या 'स्नेहबंध' चे प्रकाशन डॉ.राव, डीन, ढवळे हॉस्पिटल, ह्यांच्या हस्ते करण्यात आले. पहिलाच दिवाळी अंक असूनसुद्धा अंकाची नीटनेटकी बांधणी, साहित्य मांडणी ह्याचं सर्वांकडून कौतुक झाले.

२०११ या वर्षात युनीटतर्फे अनेक कार्यक्रम आयोजित केले. फेब्रुवारी मध्ये प्रतिशिर्डी-देहू-चंदला परमेश्वरी कार्ला-वरद विनायक महड व सप्टेंबर मधे गोंदवले-सातारा-पुणे अशा दोन सहली आयोजित केल्या होत्या. या सहलींमध्ये ऊत्स्फूर्तपणे भाग घेऊन सर्व सभासदांनी सहलींचा आनंद घेतला. घरात व सोसायटी परिसरात निर्माण होणाऱ्या ओल्या-सुक्या कचऱ्यापासून खत कसे बनवावे ह्याची माहिती दहिसरमध्ये राहणारे श्री.जे.जे.शहा ह्यांनी मार्च मध्ये झालेल्या समारंभात दिली. एप्रिल मध्ये डॉ.पाठक, दंतचिकित्सक, ह्यांनी दाताची निगा व उपचार या विषयी उपयुक्त माहिती दिली. प्रत्येक महिन्याचा शेवटचा शुक्रवार म्हणजे विशेष अतिथींची उपस्थिती. जून मध्ये आपल्या सर्वांचे परिचित व लाडके श्री.सी.एन.वालावलकर व श्री.दिपक नवलकर ह्यांनी या समारंभाचे दिवशी उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केले. सप्टेंबर मध्ये श्री.दिनेश कामत ह्यांनी उपस्थित राहून त्यांच्या बँकेच्या कार्यकालातील घडलेल्या घटना सभेसमोर मांडून सभासदांना हसत ठेवले.

काळसेकरवाडी, दहिसर (प.) येथील दत्त मंदिरात योजलेल्या कार्यक्रमात युनीटचे अध्यक्ष श्री.राजाराम मनसुख ह्यांनी डिसेंबर २०१० मध्ये भगवत्गीतेतील १ ते १८ अध्यायांवर सात दिवस प्रवचन, ऑगस्ट २०११ मध्ये महाभारतातील प्रमुख व्यक्तिरेखा व विश्वरूपदर्शन या विषयांवर उद्‌बोधक व्याख्यान दिले. तसेच ऑक्टोबर महिन्यात त्यांनी लहान मुलांसाठी कोजागिरी पौर्णिमेची माहिती व विशेष कार्यक्रम सादर केला.

युनीटने आयोजित केलेल्या वरील सर्व कार्यक्रमात सर्व सभासदांनी मनापासून भाग घेतल्यामुळे एक प्रकारचे कौटुंबिक वातावरण निर्मिती झाली व युनीट अधिक मजबूत होण्यास मदत झाली. स्टेट बँकेच्या दहिसर (पू) शाखेने दिलेले सहकार्य युनीट कधीच विसरू शकत नाही. तसेच सर्व सभासदांच्या सहकार्यानेच हे सर्व कार्यक्रम यशस्वी होऊ शकले. वरील यशस्वी कार्यक्रमांमुळे पुढील वर्षी युनीटने जोमाने वाटचाल करण्याचे ठरवले आहे.

- हेमंत नाबर, सचिव

*************

**खामगांव युनीट -**

खामगाव युनीटच्या सभासदांनी एकमेकांशी संवाद साधून कुणाला काही समस्यास असल्यास त्यांचे निराकरण करण्याचे दृष्टीने वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरवले. सर्व प्रथम 'भिशी' चालू करून त्यानिमित्त प्रत्येक सभासदाचे घरी जेवण व गप्पा असे करावयाचे ठरले. ऑक्टोबर महिन्यात श्री.आर.एल.पवार यांचे घराचे गच्चीवर कोजागिरी पौर्णिमेनिमित्त कार्यक्रम आयोजित केला होता. त्यात कांही सभासदांनी आपल्या आवडीचे गाणे सादर केले. कांहींनी हास्य-व्यंग चुटकुले सादर केले.श्री.पवार यांनी बासरीवर नाट्यगीते व माऊथ ऑर्गनवर सिनेगीते वाजवून कार्यक्रमांस बहार आणली. अशा एकत्र येण्याने कार्यक्रमाचा आनंद तर लुटता येतोच, पण त्याच बरोबर पूर्वस्मृतींना पण उजळा दिला जातो.

- एम.जी.मुनोत,अध्यक्ष

*************

**अमळनेर युनीट -**

दि.२३ ऑक्टोबर २०११ रोजी वसुबारस दिनानिमित्त युनीटने येथील कांतीलाल लल्लुभाई झवेरी गोशाळेत गोपूजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.भारतीय संस्कृतीत कृषीविषयक जिव्हाळ्याचा व आदराचा हा सण असल्याने युनीटच्या सभासदांनी गोपूजन करून गाईंच्या चाऱ्यासाठी उचित देणगी दिली. याचा सविस्तर वृत्तांत दै.वास्तवता या स्थानिक वार्तापत्रात फोटोसह छापून आपल्या युनिटच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमात केदार ब्रम्हे, विलास ब्रम्हे, गोविंद चित्ते, अनंत कुलकर्णी, प्रमोद पिंपळीकर आदी स्थनिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाग घेतला होता.

- विलास ब्रम्हे, सचिव

**************

**यवतमाळ युनीट -**

दि.२३ ऑक्टोबर २०११ रोजी यवतमाळ युनीटची वार्षिक सभा ज्येष्ठ सभासद श्री.बाळासाहेब ऊर्फ प्रभाकरजी रोठे ह्यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सर्व प्रथम उपस्थितांच्या स्वागतानंतर दिवंगत सदस्य लक्ष्मीकांतजी देशमुख यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर नवोदित सदस्य श्री.कृष्णा देवपारे व श्री.रमेश खोब्रागडे यांचे मान्यवरांचे हस्ते पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

युनीटचे माजी अध्यक्ष श्री.किरण पांडे ह्यांनी पेन्शनर्सचे टी.डी.एस. कपाती संदर्भात विस्तृत माहिती देऊन वैयक्तिक

इन्व्हेस्टमेंट डिटेल्स भरण्यासंदर्भात ऑनलाईन एच.आर.एम.एस. पोर्टल कसे वापरावे याबद्दल उपयुक्त माहिती दिली. यानंतर श्री.प्रवीण राजा यांनी आपल्या कोर्ट केसेस संदर्भात माहिती दिली. त्यानंतर सचिव श्री.गाडगे यांनी गतवर्षातील युनीटच्या कामाचा आढावा घेऊन सभासद संख्या कशी वाढते आहे याचे विवेचन केले. त्यावेळी सर्व सभासदांना दिवाळीनिमित्त पेढे देऊन तोंड गोड केले. याचवेळी युनीटचे ज्येष्ठ सदस्य श्री.तात्यासाहेब ऊर्फ प्रभाकर सरपटवार यांचे वाढदिवसाचे निमित्त पेढा भरवून त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

सभेचे संचालन सहसचिव श्री.भोंबे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.उमेशचंद्र इनामदार यांनी केले. विशेष म्हणजे यवतमाळ मुख्य शाखेचे अकाऊंटस् मॅनेजर श्री.राजाभाऊ वाघमारे आणि दत्तचौक (यवतमाळ) शाखेचे शाखाधिकारी श्री.रमेश प्रभाकर ह्यांनी सर्व पेन्शनर्सची सर्व वैयक्तिक माहिती एकत्र करून ती छापून सर्व सभासदांना दिली याबद्दल युनीटच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आभार मानले व यापुढेही असेच सहकार्य लाभावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

आणखी एक विशेष बाब म्हणजे नोव्हेंबर महिन्यात एकाच दिवशी ठरवून २५-३० सभासदांनी आपाल्या शाखेत एकत्रित जाऊन लाईफ सर्टिफिकेट सादर करून कॉम्प्युटरच्या सिस्टिममध्ये अपलोड करून घेतले.

– गोपालकृष्ण गाडगे, सचिव

******************

**कोल्हापूर युनीट -**

युनीटची वार्षिक सभा दि.२१ सप्टेंबर २०११ रोजी खरे मंगल कार्यालयात नेहमीच्याच उत्साहात सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत २५१ सभासदांच्या उपस्थितीत संपन्न झाली. याच वेळेत बँकेची 'पेन्शनर्स मीट' आयोजित केली होती. या सभेस कोल्हापूर मुख्य शाखेचे उ.म.प्र श्री.मुजुमदारसाहेब तसेच असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री.नारकरसाहेब मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते. सभा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने वेळेत सर्व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने पार पडली. सर्व सभासदांना गुलाब पुष्प व स्मृतिचिन्ह यानिमित्त देण्यात आले. सभेनंतर सर्वांनी सुरूची भोजनाचा आस्वाद घेतला.

– जगदीश दिवाण, अध्यक्ष

*********************

# खुराडी

चौसोपी वाडा होता इथे
दहा घर नांदत होती
एकमेकांच्या सुखदु:खात
हसत होती रडत होती
वाड्यात मोठं अंगण होतं
खेळ, गप्पा रंगत होत्या
परसदारी आडावर
जाई जुई डुलत होत्या
दहा जणांचे दहा उंबरे
एकमेकांना बिलगून होते
राव रंक धर्म विसरून
गुण्या गोविंदाने नांदत होते
चिरेबंदी भिंती पडल्या
उंबरे सारे उखडून गेले
खुराड्यात टू रूम किचनच्या
सारे चिडीचूप होऊन बसले
ओसरीवरच्या गप्पा गोष्टी
ऐतिहासिक होऊन गेल्या
स्कूटर फियाट मारूती कार
खेटून लगटून उभ्या राहिल्या
सुख दु:ख बोलणं चालणं
डोकावून शेजारी बघत नव्हतं
टी.व्ही. केबलच्या गोंगाटात
कुणाचं कुणाला कळत नव्हतं
चौकोनी कुटुंबात आपल्या
जो तो बेडूक बनला होता
समुद्रासारख्या जगाचा
त्याच्या हिशेबी पत्ता नव्हता
सिमेंटच्या वाढत्या जंगलात
खुराडी भरमसाट वाढत होती
वाड्यातली नांदती घरं
जाईजुईसह मुजत होती

**- आर. जी. कडवेकर**
भ्रमणध्वनी – ९४२३३२३७४०

## Reactions received from other Circle Associations on Shri.B.G.Dandekar's articles published in Samvad for July & August 2011

Shri.N.S.Dhamoon, General Secretary of Chandigarh Circle Pen. Assn.

Dear Shri.Dandekar,

On going through the encyclopedia of events listed by you, I was feeling envious. Even at this stage you are exercising your nerves. Item No.4 of your communication on 'Benefits Achieved' is a landmark achievement deserving appreciation. Against item No.6 there is a need to remember I.B.I. Pensioners notably Sh. Banarasi Dass Mehta of Delhi Circle who had put in a lot of efforts to get the issues clinched in Supreme Court. KUDOs to you.

Shri.B.B.Satpathy, General Secretary of Bhubaneswar Circle Pen. Assn.

Dear Sir,

Thank you very much for sending me 'Sambada' issues of July / August 2011 which contains lot of useful information. As the attitude of membership through the country is same and ask question like - what the Association has done for us? It will be great help if you will kindly prepare a draft highlighting our achievements which will be of immense use to all of us. How are you? We always remember you and your contribution to this great organization of ours. May God bless you to lead a healthy and peaceful life.

Shri.A.Damodaram, President of Hyderabad Circle Pen. Assn.

Dear Shri. Dandekar Ji,

I personally feel and believe that nobody can have any sarcastic remarks on the efforts put in by you as President of Federation, as you were able to not only create much of awareness among the affiliates on the pending issues but guided every one to rise to the occasion in so as to bring home the issues. I hope the achievements made by the Federation in clinching about 30 important issues can vouch safe the efforts put in by you and the results there for. I hope you are keeping good health and I personally pray THE ALMIGHTY to grant to you a healthy and long life.

***********************************

## अभिनंदनीय

आपले धुळे येथील एक सभासद श्री. हेमंत वैद्य यांची नात चि.जुई राहूल वैद्य, वय वर्षे ८, ही नाशिक येथील किलबिल शाळेत इयत्ता दुसरीत शिकत आहे. तिने नॅशनल सायबर आलिंपियाड फाउंडेशन ह्या संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत ५० पैकी ४६ गुण मिळवून शाळेत पहिला व नाशिक जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवला याबद्दल तिचे मन:पूर्वक अभिनंदन. शाळेत नेहमीच तिचा पहिला-दुसरा नंबर असतो. या शिवाय नवनीत ड्रॉइंग कॉम्पिटीशनमध्ये तिला 'बेस्ट एंट्री' म्हणून बक्षिस मिळाले. तिला स्विमिंगची आवड आहे. तिने 'ॲबाकस' मध्ये ४ लेव्हल पूर्ण करून पाचव्या लेव्हलची तयारी चालू आहे. तिला भरतनाट्यमचीही आवड असून त्याचेही शिक्षण चालू आहे. जुईच्या या चतुरस्त्र प्रगतीबद्दल तिचे अभिनंदन व भावी यशासाठी शुभेच्छा.

- सेक्रेटरी

## पापण्यांच्या राज्यात

पापण्यांच्या राज्यात आहे, गाव माझ्या स्वप्नांचे
मनीच्या विचारांना लाभतात तिथे, पंख मस्त कल्पनांचे
हळूवार जाणिवा होतात कशा, वेगळ्याच दृश्यांमध्ये साकार,
आकांक्षांना, अपेक्षांना मिळतो, स्वप्नात सुरेख आकार
मनामधली सम गाठत, नर्तन होते भावनांचे
सुख, दु:ख, हर्ष, उन्माद, जणू मणी एकाच माळेचे
शोधले जातात अलगद इकडे, खजिने सुप्त विचारांचे
आश्चर्याने बघते मी ते, भांडार अपार रत्नांचे
स्वप्नांच्या वेशीवर असते, जागृतीचे वास्तव
आठवत नाही काय पाहिले, पाऊस होता की विस्तव
साखरझोप हेच असते सत्य, अर्धोन्मलित पापण्यांचे

**- उज्वल र. ब्रम्हांडकर, विरार**

# Begin LIFE at 60 .../70/80

Many people feel unhappy, health-wise and security-wise, after 60/70/80 years of age owing to diminishing importance given to them and to their opinions. But, it need not be so, if only we understand the basic principles of life and follow them scrupulously. Here are ten mantras to age gracefully, make life after retirement pleasant, enjoy and treasure the elder years of wisdom and intelligence at its best.

**1. Never say 'I am aged' :**

There are three ages, chronological, biological, and psychological. The first is calculated based on our date of birth; the second is determined by the health conditions and the third is how old you feel you are. We don't have control over the first. But, a honest health care, a positive attitude and optimistic thinking can reverse the 2nd & 3rd age.

**2. Health is wealth :**

If you really love your kids and kin, taking care of yourself should be your priority. Thus, you will not be a burden to them. Have an annual health check-up and take the prescribed medicines regularly.

**3. Money is important :**

Money is essential for meeting the basic necessities of life, keeping good health and earning family respect and security. Don't spend beyond your means, even for your children. You have lived for them throughout and it is time you enjoyed a harmonious life with your spouse. If your children are grateful, they should take care of you. But never take it for granted.

**4. Relaxation and recreation :**

The most relaxing and recreating forces are religious attitudes, good sleep, music and laughter. Have faith in God, learn to sleep well, love good music, and see the fun side of life.

**5. Time is precious :**

It is almost like holding a horse's reins. When the reins are in your hands, you can control them. Imagine that every day you are born again. Yesterday is a paid cheque. Tomorrow is a promissory note. Today is ready cash - use it profitably. Live this moment.

**6. Change is the only permanent thing :**

We should accept change - it is inevitable. The only way to make sense out of change is to join the dance. Change has brought about many pleasant things. We should be happy that our children are blessed.

**7. Enlightened selfishness :**

All of us are basically selfish to some extent. Whatever we do, we expect something in return. We should definitely be grateful to those who stood by us. But, our focus should be on the internal satisfaction and happiness we derive by doing good to others, without expecting any compensation.

**8. Forget and forgive :**

Don't be bothered too much about others' mistakes. We are not spiritual enough to show our other cheek when we are slapped on one cheek. But, for the sake of our own health and happiness, let us forgive and forget them. Otherwise, we will only be increasing our BP.

**9. Everything has a reason; a purpose :**

Take life as it comes. Accept yourself as you are and also accept others for what they are. Everybody is unique and right in their own ways.

**10. Overcome the fear of death :**

We all know that one day we have to leave this world to make way for the new. Still we are afraid of death. We think that our spouse and children will be unable to withstand the loss. But, the truth is that the life has to go on; they may be depressed for some time. Time heals everything and they will carry on.

NO BODY GETS OUT OF THIS WORLD ALIVE!

"Regardless How Far The Journey Is OR How Capable We Are, We Do Our Best To Reach Our Goal. This Is Perseverance At Its Best ..." - Anonymous

(Contributed by Shri.Ramakant Kumta, Mumbai)

# पोलिसी दंडुकेशाही'चा अनुभव!

हा प्रसंग सन १९६४-६५ मधील असेल. त्या वेळेस माझं वय अवघं १८ वर्षांचं होतं. नुकताच मी स्टेट बँकेच्या पुण्यातील कलेक्टर ऑफिसच्या आवारातील पुणे कँप शाखेत कामाला लागलो होतो. पाणी भरणे, चहा करणे, सर्वांना पाणी देणे ही माझी कामे होती. त्याचप्रमाणे बदली होऊन आलेल्या ऑफिसर लोकांना जेवणाचे डबे आणून देणे हेसुद्धा काम मी करीत असे.

बँकेत पाणी भरण्याचे मला दरमहा तीस रूपये आणि चहा-कॉफी करण्याचे तीस रूपये मिळत. तसंच जेवणाचे डबे आणण्याचे प्रत्येक डब्यामागे मला तीन रूपये मिळत. माझ्या कष्टाळू व प्रामाणिक स्वभावामुळे नंतर बँकेतच मला प्यून म्हणून नोकरी मिळाली. मी वॉटरमनचा प्यून म्हणजे शिपाई झालो. ही नोकरीतील माझी बढतीच होती.

साहेब मंडळींचे मी दुपारच्या जेवणाचे डबे आणीत असे आणि संध्याकाळी काम संपल्यावर रिकामे डबे घरोघरी पोचवीत असे. एकदा असा प्रसंग घडला की तो मी विसरणेच शक्य नाही. संध्याकाळचे ६ वाजून ५५ मिनिटे झाली होती. बँकेत एक गुजराती साहेब होते. ते एकटेच राहत असल्यामुळे त्यांना संध्याकाळचासुद्धा डबा आणून द्यावा लागे. म्हणून मी लक्ष्मी रोडने सायकलवरून जात होतो. बॉम्बे विहार हॉटेलच्या मागे गुजराथ लॉज होते. तिथून डबा आणायचा होता.

बॉम्बे विहारच्या समोरील गल्लीच्या तोंडाशीच एक जाडजूड आणि पीळदार मिश्यांचा, हाफ पँट-हाफ शर्ट, डोक्यावर निळसर टोकदार टोपी, तिच्यावर लालभडक राजमुद्रा, उजव्या बाजूस शिटीची साखळी, कमरेला जाडजूड मजबूत चार इंच रूंदीचा कमरपट्टा, खांद्यावर 'म.रा.पो.' व छातीवर नाव कोरलेली अर्ध्या इंचाची पट्टी, पायात करकर वाजणारे (येरवडा कारागृहातील कैद्यांनी तयार केलेले) बूट अशा अवतारातील हवालदार-पोलिस माझ्यासमोर उभा होता. त्याला पाहताच सर्वजण घाबरत. तर माझी काय कथा? मी तेव्हा पोरगेलासाच होतो. माझी तर त्या हवालदाराला पाहून भीतीने गाळणाच उडाली.

त्या पोलिसाने कमरेच्या हूकला अडकवलेला हातभर लांबीचा जाड दंडुका काढून माझ्या सायकलच्या पुढील चाकावर जोराने हाणला आणि मला दरडावीत त्याने विचारले, ''ए थांब. कुठे चाललास?'' मी म्हणालो, ''गुजराथ लॉजमध्ये.'' साहेबांचा जेवणाचा डबा आणायला.''

''किती वाजले?''

''सात'' मी म्हणालो.

''तुला समजत नाही का सायकलचा दिवा लावायचा?''

माझ्या सायकलला दिवा असूनही तो लावला नव्हता. तो दिवा रॉकेलचाच होता. त्या वेळेस रात्री म्हणजे सायंकाळी ७ नंतर दिवा लावावा लागे. हा तेव्हाच कायदाच होता. शिपायाने माझं नाव, पत्ता विचारून घेतला. त्या वेळी पुणे महानगरपालिका प्रत्येक सायकलीमागे कर म्हणून दोन रूपये घेत असे व त्याला पत्र्याचा किंवा जर्मन पत्र्याचा बिल्ला देत. त्याचा नंबर सायकलच्या ब्रेकच्या पुढील नट बोल्टमुळे दिसत नव्हता. त्या बहाद्दूर पोलिसाने तो नट समोरच्याच सोनाराच्या दुकानातून पक्कड आणून तो नंबर त्याच्या डायरीत नोंदवून घेतला आणि 'जा' म्हणून मला सोडून दिले. या सर्व खटाटोपात अर्धा तास गेला आणि शेवटी आमच्या गुजराथी साहेबांना डबा एक तास उशीरा पोचला. त्या चार इंची वर्तुळाकार जर्मन पत्र्याच्या बिल्ल्यावर ''साल ६४-६५. F3915 दुचाकी कर पु.म.पा.'' असे कोरलेलं आहे. तो बिल्ला मी अजूनही आठवण म्हणून जपून ठेवलेला आहे. आयुष्यातील पोलिसांशी संबंधित आठवण मी त्यामुळे विसरू शकत नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता मला पोलिसांकडून कोर्टात हजर राहण्यासंबंधीचे समन्स आले. त्यानुसार सकाळी ११ वाजता शिवाजीनगर येथील कोर्टात हजर व्हायचे होते. झालेला सर्व प्रकार मी बँकेतील अधिकाऱ्यांना सांगितला आणि त्या दिवशी रजा घेऊन कोर्टात हजर झालो. माझ्याप्रमाणेच तिथे १०-१५ जण होते. माझा नंबर १२ वाजता लागला.

माझी पहिलीच वेळ होती. ''गुन्हा कबूल का?'' मला कोर्टाकडून विचारले गेले.

''कबूल.'' मला गुन्हा कबूल करणे भागच होते. नाहीतर दंड वाढत जाऊन शिक्षासुद्धा होते असं मला आधीच सांगण्यात आलं होतं. असा प्रसंग खरंतर कोणावरच येऊ नये असं मला वाटतं. मला मी अनुभवलेली आणि मला विसरता न येणारी पोलिसी दंडुकेशाही आठवली. त्या आठवणीला शब्दरूप देण्याचा मी प्रयत्न केला आहे.

**- दत्तात्रेय रामचंद्र क्षीरसागर**, पुणे

दूरध्वनी : ०२०-२६६८६१५५

## खुलासा

नोव्हेंबर २०११ च्या संपादकीयामध्ये पहिल्या परिच्छेदात 'संध्याछाया भीवविती हृदया' ही ओळ कवि भा.रा.तांबे यांच्या 'जन पळभर म्हणतील-हाय हाय' या कवितेतील नसून 'मधू मागशी माझ्या सख्यापरी' (मधुघट) या कवितेतील आहे. अनवधानाने झालेल्या चुकीबद्दल आम्ही दिलगीर आहोत. त्याचप्रमाणे भ्रमणध्वनी क्र. ९८९०८७०२१ या ऐवजी ९१५८००७८३१ हा आहे. कृपया वाचकांनी याची नोंद घ्यावी.

**-संपादक**

# Life As it is

Every thought that comes to our mind has the origin in the previous experiences stored in our memory over the years in the past or the wishful thinking articulating for the future. In the process, the present is often forgotten. While the life is essentially available in the present, the dwelling in the past or future makes life eclipsed with the uncertainties.

May be happiness or sad moment, time alone makes these redundant and hence neither of such events is constant. If we look at the time, it is a continuous chain of moments forming part of the present and simultaneously making them the past events. It seems therefore that too much emphasize on the past or the future for that matter is nothing but the sheer neglect of the present and thereby the reluctance to respond to life as it is.

Happiness, anger, jealousy, revenge are some of the compartments where we are destined to board in the journey of life. Different routes and different trains are available for carrying out the journey. Happiness compartment is selected generally so that we can complete the journey comfortably and peacefully. However, we realize later that happiness all the time itself makes us sad because too much of it result into sadness. Similarly, anger, jealousy and revenge compartments make jourey unpleasant because the end result is often the dissatisfaction.

Truly speaking, it should be realized that we as a person are not travelling in the journey of life but essentially our soul is travelling.

The soul itself being not bound by the cycle of death and re birth, we should refrain from dwelling either on the past or the future endlessly.

Instead, we should learn to live life as it is and as it comes rather than emphasizing on how the life should have been or should be. 'What is not' is in fact momentary and 'what is', a reality which also is not constant.

On this planet, our soul has been entrusted to play a specific role. Performance in harmony with the role assigned would be more satisfying to the soul rather than attempting to manipulate the script and act accordingly. We are engrossed in the day to day routines, a bit of detachment from the events would certainly be helpful in realizing the essence of the life.

I believe that such a step would be worthwhile in experiencing the richness of leading the life as it is.

**- Anil Shewade,** Prorvorim, (Goa)

## धनसागर मीच होवो (चाल : बलसागर भारत होवो)

धनसागर मीच होवो। हा देश खड्ड्यात जावो

वैभवी मज चढवीन
हा देश पूर्ण खाईन
तिमीरी धन संपादिन
लाजलज्जा सोडली मी हो

भांडून खाते घेईन
भूखंड सारे पचवीन
स्वीस बँकेतच ठेवीन
लपवाया पैशाला हो

जनता ही किती वेडी
बहुमताने मलाच निवडी
परी खाणे मी ना सोडी
वांझ वचने जनतेला हो

हा बघा कसा अनर्थ
संग्रही भव्य काळा अर्थ
मुखे जप सदा राष्ट्रार्थ
पद माया जमवाया हो

**- पी. एम. भगत,** भ्रमणध्वनी - ९९६७३१५७८३

# पाठलाग

दुपारच्या तळपत्या उन्हातून टॅक्सीने प्रवास करून कांताप्रसादजींनी हातातील सामान खाली ठेवल्यानंतर खिशातून रूमाल काढून कपाळावरील घर्मबिंदू टिपले. अडीचची श्रीनगरची फ्लाईट गाठणे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याने लगेच त्यांनी बोर्डिंगपाससाठी रांग पकडली. आसपासच्या तिन्ही चारी काउंटरवरही तशाच प्रकारच्या रांगा होत्या. पॅसेंजर्स आणि स्टाफ यांची लगबग चालू होती. अधूनमधून विमानांच्या आगमन आणि निर्गमन बाबतचे अनौन्सिंग चालू होते. निरनिराळ्या कंपन्यांच्या जाहिरातींनी पॅसेंजर्स इतकीच गर्दी केलेली होती. भिंतीच्या कडेला असलेले निरनिराळे चहा, कॉफी, नाश्त्यांचे स्टॉल्स भरमसाठ किंमती आकारून प्रवाशांचे समाधान करीत होते. जवळच्या मोठ्या बॅगा जमा करून कांताप्रसादजींनी बोर्डिंगपास ताब्यात घेतल्यावर ताबडतोब सिक्युरिटी जाँचची रांग पकडली आणि त्यानंतरच ते निवांतपणे वेटिंगरुममध्ये एका बाजूस विमानाच्या बोर्डिंगच्या अनौन्सिंगची वाट पाहत शांत बसले. सिक्युरिटी जाँच आटोपलेले इतर पॅसेंजर्सही वेटिंकगरुममध्ये बसण्यासाठी जागा शोधीतच होते.

कांताप्रसादजी गेली तीन-चार वर्षे ऑडिटच्या निमित्ताने सतत फिरतीवरच होते. ऑडिटसाठी पुढील शाखा श्रीनगर समजल्यापासून ते एकदम खुशीत होते. त्यांचे नजरेसमोर एक एक आठवणी तरळत होत्या. काश्मीर म्हणजे पृथ्वीवरील स्वर्गच, जिकडे तिकडे बर्फच बर्फ आणि रंगीबेरंगी फुलांनी नटलेले सृष्टीसौंदर्य, हिरवेगार डोंगरकडे, नजर पोहोचू शकणार नाही इतक्या खोल खोल दऱ्या आणि गुलाबांच्या फुलांच्या ताटव्यांची तर गर्दीच गर्दी. हे सर्व सृष्टीसौंदर्य एक महिनाभर डोळे तृप्त होईपर्यंत पहावयास मिळणार म्हणून कांताप्रसादजींचे मन आनंदाने उचंबळून आलेले होते.

घड्याळाकडे सहज लक्ष गेल्याने, विमानाच्या बोर्डिंगची वेळ झाल्याचे त्यांचे लक्षात आले. त्यांनी लगेच सोबतची हँडबॅग खांद्यावर टाकली आणि चौकशी करीत ते श्रीनगरच्या टर्मिनलकडे निघाले.

श्रीनगरच्या टर्मिनलवर पोहोचल्यावर पाहतात तर तेथे सर्वच मियाँ आणि त्यांचे बुरखेधारीय कुटूंबियच. त्यांना एकही हिंदू चेहरा दिसेना. कोणत्या खुर्चीवर आणि कोणाशेजारी बसावे हाच प्रश्न त्यांचेसमोर उभा राहिला. त्यातल्या त्यात एक निवांत जागा पाहून ते एकटेच एका बाजूस वाट पाहत स्थानापन्न झाले आणि त्याच क्षणी त्यांच्या विचारशृंखलेचा मार्ग ही बदलला.

आत्तापर्यंत त्यांचे मनात काश्मीरच्या सृष्टीसौंदर्याचेच विचार होते पण आता नजरेसमोर येऊ लागली ती काश्मीरमधील दुसरी बाजू. गेली कित्येक वर्ष अतिरेक्यांनी काश्मीरमध्ये घातलेला धुमाकूळ. कित्येक हिंदूंनी गमावलेले त्यांचे प्राण तर प्राणाच्याच भयाने कित्येकांनी काश्मीरमधून काढलेला पळ. आणि अशाच परिस्थितीत आपण स्वत:हून अशा आतंकग्रस्त आणि अनोळखी भागात जाणार आहोत या आठवणीनेच त्यांचे सर्वांगातून भीतीची एक लहर चमकून गेली आणि तोंडास कोरड पडल्याने हँडबॅगमधून त्यांनी पाण्याची बाटली काढून एका मिनिटात ती खाली केली.

काही क्षणातच विमानाच्या बोर्डिंगचे अनौन्सिंग झाल्यामुळे हातात बोर्डिंगपास घेऊन ते रांगेत उभे राहिले. विमानात बसल्यानंतर त्यांचे लक्षात आले की, कोणीतरी बऱ्याच वेळेपासून आपणाकडे पाहत आहे. त्यांनी आसपास नजर टाकली. एका व्यक्तिचा त्यांना संशय आला. डोक्यावर काश्मीरी टोपी, जाडसर भुवया, अरूंद कपाळ, धारदार नाक, गोरा रंग, अंगात नक्षीदार करड्या रंगाचा झब्बा, त्याच रंगाचा पायजमा, पोटावर रूळत असलेली व अर्धवट पिकलेली दाढी, बेपत्ता मिशा. यामुळे तर त्यांचा संशय आणखीनच बळावला. हीच व्यक्ति खूप वेळेपासून आपले सतत निरीक्षण करीत असल्याचे त्यांचे लक्षात आल्यामुळे ते त्यांची नजर चुकवित होते. अधूनमधून ज्या ज्या क्षणी ते त्या व्यक्तिकडे पाहत त्या त्या वेळी ती व्यक्ती टक लावून पाहत असल्याचे त्यांचे लक्षात आले होते. आता विमानातील त्यांची जागा तर समोरासमोरच होती. त्यामुळे त्या व्यक्तिस आपणावर लक्ष ठेवणेही सोयीचे झाले होते. याची जाणीव झाल्याने भीतीची एक लहर त्यांचे सर्वांगातून चमकून गेली. त्या व्यक्तिकडे आपण पाहवयाचे कितीही टाळले तरी ती व्यक्ति आता दीड-दोन तास आपल्यावर लक्ष ठेवणारच या विचाराने कांताप्रसादजी अस्वस्थ झाले व डोळे मिटून विचार करू लागले.

चंबळ खोऱ्यात ऑडिटसाठी गेले असताना तेथील शाखाधिकाऱ्यानी सांगितलेले काही किस्से चित्रपटाप्रमाणे त्यांचे नजरेसमोर दिसू लागले. त्या भागात एकटा दुकटा बँक अधिकारी घरी जाताना किंवा इन्स्पेक्शनचे निमित्ताने संध्याकाळी बाहेर पडताना दिसला की त्याचा पाठलाग करून संधी मिळताच त्यास किडनॅप करावयाचे, त्याचेकडून किंवा त्याचे कुटूंबीय, सहकारी यांना धमकावून दहा-पाच लाख वसूल करावयाचे आणि मगच सोडावयाचे हा धंदाच झाला होता. मग तो शाखाधिकारी असो, फिल्ड ऑफिसर असो, नाहीतर एखाद्या नवख्या ऑडिटरपैकी असो. त्यांना कसे कसे किडनॅप केले, नंतर आम्ही कसे कसे प्रयत्न केले व सोडविले यांचे मजेशीर

किस्से त्या वेळी शाखाधिकारी रंगवून रंगवून सांगत होते. एक एक प्रसंग कांताप्रसादजींचे नजरेसमोरून चित्रपटाप्रमाणे सरकत होता आणि अधूनमधून त्यांचे शरीरावर शहारे उभे राहत होते. आपल्यावर तसा प्रसंग आला तर या विचारानेच ते अस्वस्थ झाले होते. या भागात आपल्या ओळखीपाळखीचे कोणीच नाही. दुर्दैवाने किडनॅपींग झाले तर कोणास कळणार कसे, कोणी मदतीसाठी धाऊन येतील काय? आपणास मोबाईवरून बोलण्यास परवानगी मिळाली नाहीतर आपण दहा-पाच लाख कसे उभे करणार? आपल्याला आपल्या घरी आपल्या बायका-मुलांत परत जावयास मिळणार काय? असे अनंत प्रश्न कांताप्रसादजींना भेडसावू लागले. परत एकदा त्यांचे लक्ष त्या व्यक्तिकडे गेले तर ती व्यक्ति त्यांचेकडेच पाहत होती. आता आपणावर नक्कीच पाळत ठेवलीय आणि नक्कीच असा प्रसंग आपणावर गुदरणार याची त्यांना खात्री वाटू लागली.

इतक्यात विमान लँड होत असल्याची सूचना अंतर्गत व बहिस्थ तापमानांच्या आकड्यासह मिळाली. आता त्या व्यक्तिस चुकवावे कसे, स्वत:ची सुटका कशी करवून घ्यावी याचेच विचारचक्र कांताप्रसादजींचे मनात सुरू झाले.

ज्या क्षणी विमान लँड झाले त्या क्षणी आपणावर अजूनही पाळत आहे याची पुन्हा एकदा खात्री झाल्यावर ती व्यक्ति ज्या दरवाजाने उतरली त्याच्या विरुद्धच्या दरवाजाने कांताप्रसादजीखाली उतरले आणि इकडे तिकडे नजर ठेवीत ते लगेज-बेल्टजवळ जाऊन सामान घेण्यासाठी गर्दीत मिसळले. अधूनमधून ते पाठीमागचा कानोसा पण घेत होते. इतक्यात त्यांचे पाठीवर कोणीतरी थोपटते आहे असे त्यांना जाणवले. लगेज-बेल्टवर लक्ष ठेवता ठेवताच एक क्षणभरच चमकून त्यांनी पाठीमागे वळून पाहिले तर तीच व्यक्ति. त्यांना वाटले आपल्या पायाखालची जमीन हादरते आहे. त्यांच्या अंगाला दरदरून घाम फुटला. शरीर थरथरू लागले. क्षणभर वाटले सामान सोडून पळून जावे पण गर्दीमुळे पळता येणेही शक्य नव्हते. परत पाठीवर थोपटल्याचा भास झाला म्हणून मागे वळून पाहतात तर तीच व्यक्ति कांताप्रसादजींचे कानाजवळ तोंड आणून हळू आवाजात विचारीत होती.

''आप ही कांताप्रसादजी है ना!''

उत्तर देण्यापूर्वीच त्यांची पाचावर धारण बसली. आता कोठलाच पर्याय न राहिल्याने नाईलाजास्तव ते म्हणाले,

''हाँ, मै ही कांताप्रसाद हूँ।''

असे म्हणताच त्या व्यक्तिने हँडबॅगमधून एक कागद बाहेर काढला आणि तो उघडून कांताप्रसादजीचे समोर धरला. त्यावर लिहिले होते. "Mr. Kantaprasadji, welcome to SBI Shrinagar."

तरी पण त्यांच्या मनावरील ताण कमी झाला नाही. या व्यक्तिने आपणाबद्दल किती योजनापूर्वक ही माहिती मिळविलेली असणार. आपण विमान तळावर काहीतरी गडबड करू हे गृहीत धरून पद्धतशीर बनविलेला हा बनाव तर नसेल ना. अशी शंका त्यांना आली व परत एकदा मनात पाल चुकचुकलीच.

आता मात्र ती व्यक्ति म्हणेल त्याप्रमाणेच वागणे कांताप्रसादजींना भाग होते. त्या व्यक्तिने ठरविलेल्या टॅक्सीतच बसल्यावर त्यांच्या तोंडून शब्दही फुटला नाही. टॅक्सी धावत होती पण त्यांचे मन व्याकुळले होते. टॅक्सी एस.बी.आय. श्रीनगरच्या आवारात शिरल्यावर मात्र त्यांचा जीव भांड्यात पडला आणि ज्या व्यक्तीस ते अतिरेकी समजत होते ती व्यक्ति म्हणजे बँक स्टाफ मेंबरच होती याची पण त्यांना खात्री पटली.

**- शंकर मु. हुद्देदार,**
भ्रमणध्वनी - ९९७०५३९७६५

# सत्तरीत तृप्त मी

वर्षामागुनी वर्ष उलटली, गाठली मी सत्तरी
निवांत समयी दाट बरसती, आठवणींच्या सरी ।।१।।

बालपणीची अल्लड खळखळ, सुखविते जिवाला
तरूणाईतील धांगडधिंगा, खुणावितो मनाला ।।२।।

झाले शिक्षण, छान नोकरी, सापडलीही छोकरी
मनाजोगती सहचारिणी, रमली संसारी ।।३।।

संसाराच्या वृक्षवेलीवर, दोन फुले उमलली
स्वप्न वास्तूचे साकारले अन् इच्छापूर्ती जाहली ।।४।।

दोन सुपुत्र माझे बाहू, परी नसती उजवा-डावा
स्नुषा दोन मुलीच आमुच्या जणू मैत्रिणी जावा-जावा ।।५।।

तीन देविया नाती घरच्या चमचमत्या चांदण्या
कल्पनेत जाणार सासरी, ओलावती पापण्या ।।६।।

संसाराची नाव इथंवर सुखरूप आजवर आली
सत्तरीत मी तृप्त जाहलो, स्वप्नपूर्ती जाहली ।।७।।

**- प्रभाकर कानिटकर,** कोल्हापूर
भ्रमणध्वनी - ९८८११९९१९९

# प्रतिक्रिया

'संवाद'चा दिवाळी विशेषांक दिवाळीतच मिळाला. श्री. क्रांतिसेन आठवले यांचे संपादकीय खूप आवडले. आपण काय करायला हवे? हे त्यांनी विचारपूर्वक क्रांतिकारक शब्दांनी मांडले आहे. Bringing up new generation हा श्री. एस.व्ही. नाईक यांचा लेख खूप शिकवण देणारा आहे. श्री. वसंत धुपकर यांचा 'भैरवी' हा लेख अप्रतिम. ते आम्हा वृद्धांना तारुण्यात घेऊन गेले. श्री. गुपचूप यांचा 'तेव्हा तू तशी' या लेखाने आमच्या गतकाळातील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला व आमच्या आठवणी लिहिण्यास प्रोत्साहित केले. श्री. शरद शिंगवेकर यांनी 'भयमुक्त जगावे कसे' हे अप्रतिमरित्या मांडले आहे. खूप आवडले. एकूणच 'संवाद'चा वैविध्यपूर्ण असलेला दिवाळी विशेषांक दिल्याबद्दल संपादक मंडळाला धन्यवाद!

– श्री. अशोक दत्तात्रय बुटाला, मुंबई

भ्रमणध्वनी – ९८३३१४८९०४

* * *

'संवाद'चा दिवाळी अंक मिळाला पण दिवाळी अंक म्हणावा तसा खुसखुशीत वाचायला मिळाला नाही त्यात विविधता नव्हती. त्याच त्याच लेखकांच्या लेखांचा समावेश पाहून वाटले की आपल्या एवढ्या सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्यात प्रतिभा नाही की त्यांच्या लेखनाला स्थान दिले जात नाही? आगामी अंक विविध लेखकांच्या निरनिराळ्या विषयांवरील साहित्याने नटलेले मिळतील हीच सदिच्छा!

– अरविंद धराधर, अंधेरी

उत्तर : आपल्या स्पष्ट व रोखठोक प्रतिक्रियेबद्दल आपणास प्रथमच आम्ही धन्यवाद देतो. मात्र आपल्या पत्रात व्यक्त झालेल्या मतांशी आम्ही सहमत नाही हे नम्रपणे सांगू इच्छितो. कारण 'संवाद'च्या दिवाळी विशेषांकात समाविष्ट केलेले लेख 'विविध' विषयांवरच आधारित आहेत. लेखक नेहमीचेच असले तरी विषयांचे वैविध्य असलेले आहेत. ही गोष्ट आपण अधिक विचार केल्यास आपणालाही पटेल. संपादक मंडळ नेहमीच चांगल्या लेखांच्या प्रतीक्षेत असते आणि 'संवाद'कडे आलेल्या लेखांमध्ये वैविध्यपूर्ण लेखांना स्थान दिले जातेच. आमच्या संपादकीयांमध्ये सर्व सभासद मित्रांना 'लिहिते व्हा', 'संवाद'ला चांगल्या साहित्याची अपेक्षा आहे असे आवाहन वेळोवेळी केले जाते तरीही सभासदांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही हे खेदाने नमूद करावेसे वाटते. आपणास विनंती की आपणही निरनिराळ्या विषयांवर वैविध्यपूर्ण लेख लिहून 'संवाद'कडे पाठवावेत. संपादक मंडळ त्याचे नक्कीच स्वागत करील. प्रत्येकापाशी प्रतिभा असतेच. आपले सभासद त्याला अपवाद कसे असतील? मात्र प्रतिभेला लेखनरूप देण्यासाठी लेखन गुणसुद्धा असावे लागतात आणि लिहिण्याचा उत्साहदेखील. हे आपण मान्य करालच. आपल्या सभासदांच्याही वैविध्यपूर्ण लेखनाची आम्ही नेहमीच प्रतीक्षा करीत असतो. कृपया कोणीही गैरसमज करून घेऊ नये.

– संपादक मंडळ

## स्वतंत्रता गान

'स्व' से स्वतंत्रता
'पर' से परतंत्रता ।
'स्व' से मिले स्वानंद
'पर' से पराधिनता की पीडा।।

'स्व' में रमना हितकर
और 'पर' से पीछा छुडाना ।
परछाई और 'पर' का पीछा
क्या एक सा फल नहीं देता? ।।

'स्व' सदा अपने अधिन
'पर' पे हमारा बस कहा?
क्या शरीर की बिमारी बुढापा
मौत हमारे बसमें है ।।

'स्व' में भरी शान्ती
'पर' में मिले अशान्ती
फिर भी,
भो चेतन ! क्यू
निजको छोड 'पर' में रमता
और दुःख उठाता ।।

हुआ जब से आतम भान
दुःख का ना रहा नामनिशान
अब सुख की भई भोर
क्यू मनवा मचावे शोर
ओम् शान्ति ! शान्ति!! शान्ति!!

**– सुरेशचंद्र र. जैन,** औरंगाबाद

भ्रमणध्वनी – ९८६०६१२३५०

# दुधावरची साय

अथर्व!

मी तुझ्याबद्दल जे लिहितो आहे -

त्या सगळ्याचा अर्थ समजण्याइतका तू वयाने मोठा नाहीस. आजोबांची ही स्तुती ऐकून (खरं म्हणजे वाचून) तू उतशील, मातशील अशी भीतीही नाही. मुळात तुला हे इतक्यात वाचताही येणार नाही. तू तर आहेस अवघा 'तीन' वर्षांचा!

नू.म.वि. मध्ये शिशू गटात नाव घातल्याच्या दुसऱ्या महिन्यात वर्गावर्गातून तुला 'हनुमान' म्हणून सगळे ओळखायला लागले. शाळेत तुझा गोड हसरा चेहरा पाहून कोणीही तुला नाव विचारलं की तू जेव्हा बिनदिक्कतपणे 'हनुमान' असं नाव सांगतोस तेव्हा शाळेच्या रजिस्टरमध्ये लिहिलेलं 'अथर्व अविनाश लावणीस' हे नाव सुद्धा दचकतं! प्रभु रामचंद्राच्या खऱ्या शिष्याचं तुला इतकं वेड की घरात निरनिराळ्या रंगाच्या फुग्यांच्या, प्लॅस्टिकच्या आणि लाकडी किमान दहा तरी गदा असतील. रामायणाची व्हिडिओ कॅसेट तुला तोंडपाठ. शाळेत शिक्षकांनी 'भीमरूपी महारूद्रा' हे स्तोत्र तुझ्याकडून वर्गावर्गातून म्हणवून घेतलं, तेव्हा सुद्धा स्तोत्र सुरू करताना मुलांचा गोंधळ दिसला की थांबून 'अरेऽच्या' असं म्हणून गोंगाट कमी झाला तरच स्तोत्र सुरू करतोस तू रंगमंचावरच्या एखाद्या मुरब्बी कलाकारासारखा. घरात येणाऱ्या सगळ्यांच्या नकला करतोस. (अगदी माझीसुद्धा! पोट पुढे करून चालतानाची माझी ढब दाखवत सगळ्यांना हसवतोस) माझे सर्व मित्र तुझे 'आजोबा' त्यांनाही तुझा एवढा लळा की वेफर्सचा पुडा किंवा कॅडबरीशिवाय त्यांनी कधी घरी 'एन्ट्री' घेतली नाही. तुझ्या वडिलांचे सगळे मित्र तुझे 'प्राध्यापक काका'!

सकाळी दूध आणायला आईबरोबर हात धरून बाहेर पडलास की गल्लीतल्या घराघरातून तुला पाहून 'अथर्व-अथर्व' असा पुकारा सुरू होतो. महालक्ष्मीचे दुधवाले काका तुझ्या हातूनच कार्ड स्वीकारणार आणि तुझ्या इवल्याशा हातात न मावणारी प्लॅस्टिकची दुधाची पिशवी ठेवणार - (आमची दखल न घेता) कारण तू त्यांचा लाडका.

नुकत्याच झालेल्या लायन्स क्लबच्या फॅन्सी ड्रेस स्पर्धेत - 'विठ्ठल, विठ्ठल' असा गजर करीत ॲम्फी थिएटरच्या रंगमंचावर तू पहिली 'एन्ट्री' घेतलीस तेव्हा वारकऱ्याच्या वेषात तू असा दिसत होतास की तुझ्या भेटीसाठी १५ ऑगस्टचा राष्ट्रीय मुहूर्त साधून पंढरपूरचा प्रत्यक्ष विठोबाच आता अवतरणार असं मला वाटायला लागलं. ६५ मुलांच्या छोट्या गटात तुला मिळालेलं 'पहिलं बक्षीस' ही तुझी सुरुवात आहे! आज घरातले बक्षिसांचे कपाट तुझ्या ह्या पहिल्या 'पहिल्या' बक्षिसाने मोहरले आहे.

पण आत्ताच लक्षात ठेव. आयुष्यात यश हे कधीच एकट्याचं नसतं. आई-वडील, गुरू यांची शिकवण आजी-आजोबा आणि वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद हे या यशाच्या मागे असतात. 'अपयशाला' मात्र आपणच एकट्याने, धैर्याने सामोरं जायचं असतं. लहान आहेस अजून. हळूहळू सारं समजेल तुला.

जन गण मन म्हणताना 'द्राविड' म्हणजे काय हो आबा? ह्याला काय म्हणतात? असे दिवसातून शंभर प्रश्न विचारून भंडावून सोडतोस. मीही 'न' कंटाळता तुला उत्तरं देतो पण जसजसा मोठा होशील, वयानं, ज्ञानानं, अनुभवानं वाढशील तेव्हा तुझ्या प्रश्नांना उत्तरं नसतील माझ्यापाशी.

त्यावेळी -

तुझ्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर नसेल माझ्याकडे,  
तुझ्या प्रत्येक समस्येवर तोडगाही नसेल माझ्याकडे  
तुझ्या रोजच्या धावपळीच्या जगण्यात  
फारशी जागाही नसेल माझ्यासाठी,  
म्हणून,  
तुझं बोट सोडून मी तुझ्या खांद्यावर हात ठेवणार आहे  
कधी गरज असेल तुला तेव्हा,  
'मी आहे बरं' हे सांगण्यासाठी  
किंवा  
कधी मलाच गरज वाटली तर  
आधार... घेण्यासाठी........ (कविता - डॉ. वर्षा झाडे, नागपूर)

दुधापेक्षा दुधावरच्या सायीसाठी माणूस कां व्याकूळ होतो हे आत्ता मला समजले.

**- शशिकांत लावणीस**

भ्रमणध्वनी - ९४२१०२६२७९

## नववर्षाच्या शुभेच्छा!

**आमच्या सर्व सभासदांना, 'संवाद'च्या वाचकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना असोसिएशनच्या आणि 'संवाद'च्या वतीने 'वर्ष २०१२' या नववर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा !**

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Licence to post at Market Yard P.S.O. on 25th of each Month

## सूर-रंग

रंगात रंग सात रंग
मोरपीस दावी अंतरंग ||१||

रंगात रंग जणू सप्तर्षी
नभात वसती ते महर्षी ||२||

ऊनपावसात रंगे इंद्रधनुष्य
अचंबित होऊनी दंग मनुष्य ||३||

रंगांचा असे 'तानापिहिनीपाजा'
सूरांचा असे 'सारेगमपधनीसा' ||४||

रंग करिती सप्तरंगांची उधळण
सूर करिती सप्तसूरांची परवरण ||५||

रंगतो रंगसूरांचा हा खेळ
निसर्ग मानवाचा अनोखा हा मेळ ||६||

**- जयंत गोरे,** पुणे
भ्रमणध्वनी - ९९६०५९६६८६०

## व्याकुळ सूर

संध्यासमयी अचानक दुरूनी
मधाळ सूर तुझे ते कानी आले
असंख्य पाखरांना, मनातील माझीया
दाणे चैतन्याचे, भरवून गेले
मग भूतकाळाच्या पोतडीत मी,
आठवणींचे गजरे विणले
त्या नशिल्या गप्पांमधूनी
रात्र सारी मी स्वप्नात जागले
मनाच्या माझ्या गाभाऱ्यात रे
मूर्ती तुझी मी सदैव पूजली
या जन्मी जरी तुझी नाही झाले
तसंही तुझ्या आठवणींच्या पावसात, मी चिंब भिजले

**- दिलीप अ. रेडकर,**
मुंबई

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.